# देवाची सेवा करण्यासाठी तुमची नोकरी व शाळेतील वेळेचा उपयोग करा


अक्विल्ला व प्रिस्किल्ला आणि प्रेषित पौल आपला खर्च चालवण्यासाठी स्वत: काम करीत असत

**प्रार्थना:** ‘‘हे प्रभु ख्रिस्ती सेवकांना बरेचदा दोन दोन नोकऱ्या का असतात हे मुलांना समजण्यासाठी कृपा करुन ह्या अभ्यासाचा उपयोग करुन घे. यांच्यापैकी बरेचसे सेवक मेंढपाळ व सुवार्तिक म्हणून येशूची सेवा करतानाच स्वत: चा खर्च चालवण्यासाठी आपल्या हातानी काम करतात.’’

मुलांना शिकवण्यासाठी पुढीलपैकी कोणतीही कृती निवडा.

मोठा मुलगा मुलगी किंवा शिक्षकांना प्रे. कृ. 18:1-11 ह्या वचनांमधील तंबू तयार करणाऱ्यांची गोष्ट वाचायला सांगा यामध्ये देवाने प्रिस्किल्ला, अक्विल्ला व पौल ह्यांच्या कौशल्याचा उपयोग करिंथ शहरात मंडळी सुरु करण्यासाठी कसा करुन घेतला, हे सांगितले आहे. ते आपला खर्च चालवण्यासाठी तंबू तयार करीत.

शक्य असल्यास मुलांना हे **चित्र** काढव्यास वा रंगवण्यास सांगा.



गोष्ट सांगुन झाल्यावर पुढील **प्रश्न विचारा.**

- पौलाला करिंथ मध्ये राहव्यास जागा कोठे मिळाली? *(उत्तर, पाहा वचन 3)*
- पौलाने करिंथमध्ये आपला खर्च कसा चालवला? *(3)*
- पौलाचे म्हणणे ऐकण्यास यहूदी लोकांनी नकार दिल्यावर त्याने काय केले? *(6)*
- पौलाने करिंथ मध्ये दिलेल्या शिक्षणाचा परिणाम काय झाला? *(8)*
- देव आपले सेवेचे कार्य आशीर्वादित करीत आहे, हे पौलाला कसे समजले? *(9-10)*

### वृत्तांताच्या भागांचे नाट्यीकरण करा

मुलांबरोबर राहून नाटकाची तयारी करा. हे तुम्हांला कमी करता येईल.

**मोठया मुलांना** किंवा प्रौढांना पुढील भूमिका करु द्या.

**निवेदक** गोष्ट थोडक्यात सांगून काय बोलायचे ते मुलांना समजावून सांगा.

**प्रिस्किल्ला व अक्विल्ला** सुया व दोरा आणि कापड (किंवा कापड शिवण्याची फक्त कृती करा)

**पौल**

**लहान मुलांना** पुढील भूमिका करु द्या.

**यहूदी लोक**

**क्रिस्प**

**हेल्लेणी लोक**

**नाटक, भाग 1, प्रे. कृ. 18:1-4**

**निवेदक:** गोष्टीचा पहिला भाग सांगा (व 1-4) आणि म्हणा ''अक्विल्ला आणि प्रिस्किल्ला काय म्हणतात ते ऐका.''

**अक्विल्ला:** पौलाला कापड देऊन म्हणतो ''पौल कृपा करुन आतया, येथेच आमच्या बरोबर राहून काम करा आम्ही करतो तसे तंबू तयार करा.''

**प्रिस्किल्ला:** ''हो बरोबर आहे. तुम्हांला येथे करिंथ मध्ये राहून देवाचे वचन शिकवता यावे यासाठी पुरेसे पैसे मिळवण्यास आम्ही तुम्हांला मदत करु.''

**पौल:** ''मला स्वत:चा खर्च चालवता यावा म्हणून मदत केल्याबद्दल धन्यवाद. यामुळे देवाची इच्छा असेल तेथे जाण्याची मला संधी मिळणा आहे. मला आता प्रत्येक शनिवारी जाऊन सभास्थानात शिकवता येईल.''

**नाटक, भाग 2, प्रे. कृ. 18:5-11**

**निवेदक:** गोष्टीचा दुसरा भाग सांगा (व 5-11) आणि म्हणा, ''यहूदी लोक काय म्हणतात ते ऐका.''

**यहूदी लोक:** ओरडतात, ''पौला आम्ही तुझे ऐकणार नाही. येथून चालता हो!''

**पौल:** कपडयावरची धूळ झटकण्याची कृती करा आणि म्हणा,'' आता येथून पुढे तुमचा माझा काही संबंध नाही, तुमची जबाबदारी माझ्यावर नाही. मी दुसऱ्या लोकांकडे हेल्लेणी लोकांकडे जातो त्यांना येशू विषयी ऐकायचे आहे!''

**क्रिस्प:** ''पौला, तुला आता सभास्थानात कधीच शिकवता येणार नाही मग तू आता, शेजारीच माझे घर आहे तेथे येऊन लोकांना शिक्षण दे.''

**हेल्लेणी:** ''आम्ही हेल्लेणी लोक क्रिस्पाच्या घरी पौलाकडून शिकू त्यांचे म्हणणे ऐकू''

**क्रिस्प:** ''पौला, तू सांगितलेले शुभवर्तमान मी ऐकले आहे. मी यहूदी सभास्थानाचा अधिकारी आहे, परंतु आता भला ख्रिस्ताच्या मागे यायचे आहे. कृपा करून मला व माझ्या कुटुबियांना बाप्तिस्मा द्या.''

**पौल:** ''तुम्ही सर्वांनी मला करिंथ शहरात राहण्यास खूप मदत केली त्याबद्दल मी तुमचे आभार मानतो देवाने मला भिउ नको असे सांगितले आहे कारण तो येथील अनेक लोकांचे तारण करणार आहे.''

**हेल्लेणी:** ''पौल भाऊ, तुम्ही करिंथमध्ये राहून शिकवणार म्हणून आम्हांला खूप आनंद झाला तुमच्या सर्वांच्या चांगल्या कामामुळेच आता आम्ही येशूचे शिष्य होऊ.''

**निवेदक:** नाटक कधी संपणार ते सांगा आणि मुलाचे आभार माना.

मुलांनी हे नाटक मोठया लोकांसमोर सादर केले असेल तर, त्यांना मोठया लोकांना भाग 1 मधील प्रश्न विचारू द्या. त्यांनी काढलेली चित्रे मोठयांना दाखवावीशी वाटतील तसेच त्यांनी केलेले पाठांतर बोलून दाखवावे असे वाटेल.

मंडळीच्या पुढाऱ्याशी चर्चा करुन पुढील गोष्टीची मुलांसाठी व्यवस्था करा:

- त्यांचे नाटक उपासनेमध्ये मोठया लोकांसमोर सादर करा.
- ह्या अभ्यासाच्या आरंभी दिलेले प्रश्न मोठया लोकांना विचारा
- त्यांनी तयार केलेली कविता आणि अन्य गोष्टी सादर करा.

**मुलांना विचारा:** ''देवाचे वचन शिकवत असताना स्वत:चा खर्च चालवण्यासाठी लोकांना तंबू तयार करण्याशिवाय आणखी कोणते काम करता येईल त्याची उदाहरणे द्या?'' (मुलांना उदाहरणे सांगू द्या.)

**तंबूचे चित्र काढा**

- मुलांना ते चित्र कागदावर काढू द्या.
- मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.
- पुढच्या उपासनेच्या वेळी मुलांना त्यांची चित्रे मोठयांना दाखवव्यास सांगा.
- मोठया लोकांना चित्रे दाखवून, अक्विल्ला, प्रिस्किल्ला व पौल ह्यांच्या प्रमाणे आपल्यालाही प्रभुसाठी काम करण्याच्या कौशल्याचा उपयोग करता येतो हे मुलांना स्पष्ट करुन सांगू द्या



ख्रिस्ती लोकांना स्वत:चा खर्च चालवण्यासाठी काम करताना इतरांची सेवा करता येते आणि ख्रिस्ताविषयी शिक्षण देता येते हे मुलांना समजावून सांगा, त्याच प्रमाणे इतर ठिकाणी जाऊन सुवार्ता सांगणाऱ्यांना देखील त्यांना मदत करता येईल.

**पाठ करा 1 करिंथ 10:31**

म्हणा–चार मुलांना 2 थेस्सल. 3:7,8,9, व 10 ह्या शास्त्रपाठातील प्रत्येकी एक वचन म्हणायला सांगा.

मोठया मुलांना कविता गीत किंवा लहानशी गोष्ट लिहिण्यास सांगा अथवा साक्ष देण्यास सांगा यातून ख्रि स्ती लोक येशूची सेवा करताना आपला खर्च चालवव्यासाठी काय करतात त्याचे उदाहरण त्यांनी द्यावे.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभु तू आम्हांला सर्वांना निरनिरळी कामे करण्याची शक्ती दिलीस याबद्दल आम्ही तुझे उपकार मानतो आमच्या कडे असलेले प्रत्येक कौशल्य आणी क्षमता तुझ्यासाठी उपयोगात आणावे म्हणून तू आमचे सहाय्य कर प्रिस्किल्ला व अक्विल्ला ह्यांनी पौलाला मदत केली त्याप्रमाणे आमच्या ही कामाचा उपयोग इतरांच्या मदतीसाठी करुन घे आणि आम्हांला आनंदाने काम करण्यास शिकव.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net